थोडक्यात

'गणेश पत्रीं'वर व्याख्यान

मुंबई : मराठी विज्ञान परिषद आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'गणेश पत्री' विषयावर प्रा. चंद्रकांत लट्टू (वनस्पतीतज्ज्ञ) यांच्या व्याख्यानाचे आयोजन शुक्रवार दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पूर्व) येथे केले आहे. हे व्याख्यान विनामूल्य असून, २१ पत्रींची वैज्ञानिक माहिती या व्याख्यानातून मिळेल. अधिक माहितीसाठी संपर्क दूरध्वनी ०२२- २४०५ ४७१४ / २४०५७२६८

विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

मुंबई : गोवेरी ग्रामस्थ सेवा मंडळाच्यावतीने दहावी,बारावी आणि पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गोवेरी ग्रामस्थांच्या मुला-मुलींचा गुणगौरव शिरोडकर हायस्कूल, परेल येथे करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या आई-वडिलांचादेखील सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक विजय शिवराम पांचाळ, गोवेरी ग्रामस्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर धोंडू गावडे आणि विशेष सल्लागार अच्युत न्हानू गावडे उपस्थित होते. या गुणगौरव सोहळ्यात मुंबईस्थित गोवेरी ग्रामस्थ प्रिया संतोष गावडे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

शिक्षकांनी टेक्नोसॅव्ही व्हावे

मुंबई : ''भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांनी टेक्नोसॅव्ही व्हावे,'' असे आवाहन 'शिक्षक मित्र' संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांनी केले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी 'शिक्षक मित्र' व ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था यांच्यावतीने विक्रोळी येथील संदेश विद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना बाळासाहेब म्हात्रे यांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शिक्षकांनी टेक्नोसॅव्ही व्हावे, असे आवाहन केले. तसेच शिक्षकांच्या भूमिकेचा गौरव केला आणि राष्ट्र विकासासाठी शिक्षकांकडून होत असलेल्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. यावेळी ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या खजिनदार पुष्पलता म्हात्रे, विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदेश म्हात्रे, डॉ. सुखदा चिराटे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालिकेकडून दोन वर्षांत ५५२ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण

ऑक्टोबरपासून १,३४३ कामे सुरू होणार

मुंबई, दि. ५(प्रतिनिधी): मुंबई महापालिकेने गेल्या दोन वर्षांत ५५२ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण केली असून प्रलंबित रस्ते व जंक्शन दुरुस्तींच्या कामांना येत्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरुवात होणार आहे. पावसाळ्यामुळे थांबविण्यात आलेल्या ७१९ आणि नवीन १ हजार ३४३ रस्त्यांची व जंक्शनच्या दुरुस्ती कामांचा यात समावेश असून ही कामे टप्प्या टप्प्याने हाती घेण्यात येणार आहेत.

मुंबईतील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती कामे पालिकेने हाती घेतली आहेत. मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ, खासगी संस्थांद्वारे सातत्याने खोदण्यात येणारे चर, जलवाहिन्यांना लागलेली गळती, पर्जन्य वाहिन्यांचे अपूर्ण जाळे आणि पावसाळ्यात रस्त्यांवर पडणारे खड्डे यामुळे रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील ५०७.६२ किमी लांबीच्या रस्त्यांची १ हजार ३४३ कामे ऑक्टोबर २०१८पासून टप्प्या टप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. या कामांमध्ये सध्या निविदा प्रक्रिया सुरू असलेल्या २०२.३१ किमी लांबीच्या ६२४ रस्त्यांचा समावेश आहे. या कामांमध्ये शहर भागातील ४६.१६ किमी लांबीच्या १९९ रस्ते कामांचा समावेश आहे, तर पूर्व उपनगरातील ४७.८९ किमी लांबीच्या १५५ रस्ते आणि पश्चिम उपनगरातील १०८.२६ किमी लांबीच्या २७० रस्त्यांचा समावेश आहे. उर्वरित ३०५.०८ किमी लांबीच्या रस्त्यांची ७१९ कामे ही पावसाळ्यामुळे थांबविण्यात होती. १ लाख ३१ हजार ८ चौरस मीटर एवढ्या क्षेत्रफळाच्या जंक्शनच्या कामांचा समावेश असेल, अशी माहिती रस्ते व वाहतूक खात्याचे प्रमुख अभियंता विनोद चिठोरे यांनी दिली आहे. पावसाळ्यामुळे थांबविण्यात आलेल्या कामांमध्ये ३०५.०८ किमी लांबीच्या ७१९ रस्त्यांचा समावेश आहे. यामधील २३८.४५ किमी लांबीचे रस्ते हे 'प्रकल्प रस्ते' या वर्गवारीतील आहेत, तर जे रस्ते पूर्णपणे नव्याने करण्यात येणार आहेत, अशा रस्त्यांचा समावेश 'प्रकल्प रस्ते' या वर्गवारीत करण्यात येईल. या व्यतिरिक्त 'प्राधान्यक्रम २' या वर्गवारीतील राहिलेल्या ७.७१ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे ऑक्टोबरपासून हाती घेण्यात येणार असून 'प्राधान्यक्रम ३' अंतर्गत ५८.९२ किमी लांबीच्या रस्त्यांची कामेही ऑक्टोबर २०१८पासून हाती घेण्यात येतील, तर मागील दोन वर्षांपासून म्हणजेच २०१६पासून दि. ३१ मे, २०१८पर्यंत ५५२.७१ किमी लांबीच्या रस्त्यांची आणि २ लाख ८८ हजार २७८ चौरस मीटर एवढ्या क्षेत्रफळांच्या जंक्शनची कामे करण्यात आल्याचे चिठोरे यांचे म्हणणे आहे.



६२ निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर

नवीन रस्ते कामांसाठी ६२ निविदांची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ऑक्टोबर,२०१८मध्ये कार्यादेश दिले जातील. या निविदांमध्ये शहर भागातील व पूर्व उपनगरातील प्रत्येकी १५ निविदा, तर पश्चिम उपनगरातील ३२ निविदा यानुसार एकूण ६२ निविदांचा समावेश आहे. या कामांसाठी १ हजार ५०८ कोटी ८३ लाख एवढी अंदाजित रक्कम खर्च केली जाणार आहे. त्यातून ३८७ कोटी एवढी रक्कम शहर, ३७५ कोटी ६५ लाख रुपये पूर्व उपनगरांसाठी आणि ७४६ कोटी १७ लाख रुपये पश्चिम उपनगरांसाठी खर्च करण्यात येणार आहे.

चौथी जागतिक आपत्ती व्यवस्थापन काँग्रेस जानेवारीमध्ये मुंबईत : चंद्रकांतदादा पाटील

जगभरातील पंधराशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थितीत राहणार

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी): आपत्ती निवारणासंदर्भात चर्चा, संशोधन व्हावे, यासाठी 'फ्युचर वी वॉन्ट - ब्रिजिंग गॅप बिटविन प्रॉमिसेस ॲण्ड ॲक्शन' या संकल्पनेवर आधारित चौथी जागतिक आपत्ती व्यवस्थापन काँग्रेस दि. २९ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०१९ या दरम्यान मुंबई आयआयटी येथे आयोजित करण्यात आली असून महाराष्ट्र शासनाने या जागतिक परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेत जगातील शंभरहून अधिक देशातील पंधराशे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेसाठी गठित सुकाणू समितीची पहिली बैठक आज मंत्रालयात मदत व पुनर्वसनमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी मुख्य सचिव दिनेशकुमार जैन, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव मेधा गाडगीळ, आपत्ती व्यवस्थापन प्रभागाचे संचालक दौलत देसाई, आपत्ती व्यवस्थापन उपक्रम आणि अभिसरण सोसायटीचे सल्लागार व माजी केंद्रीय सचिव पी. जी. धार चक्रवर्ती आदी यावेळी उपस्थित होते.

दि. २९ जानेवारी २०१९ रोजी या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. आपत्ती निवारणासंदर्भातील जागतिक संरचनेच्या अंमलबजावणीमधील आव्हानांवर या परिसंवादात चर्चा होणार आहे. परिषदेत विविध सत्रांमध्ये आठ विषयांवर परिसंवाद होणार आहेत. यामध्ये जागतिक पातळीवरील तज्ज्ञ व्याख्याने देणार आहेत. तसेच विविध संशोधकांना परिषदेत आपले शोधनिबंध मांडता येणार असून हे शोधनिबंध नंतर जागतिक पातळीवरील प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. या परिषदेतील मांडण्यात येणारे शोधनिबंध, संशोधन व नाविन्यपूर्ण स्टार्टअपसाठी पारितोषिके देण्यात येणार आहेत. येत्या दि. १० सप्टेंबरपासून ३१ ऑक्टोबरपर्यंत लघुनिबंध पाठविता येतील. परिषदेत लोकप्रतिनिधी, विविध शहरांचे महापौर, आपत्ती व्यवस्थापन कार्यात सहभागी अधिकारी यांचाही सहभाग असणार आहे.

डीएमआयसीएसच्यावतीने पहिली आपत्ती व्यवस्थापन काँग्रेस हैद्राबाद येथे २००८ मध्ये झाली. त्यानंतर दुसरी सन २०१५ व तिसरी परिषद सन २०१७ मध्ये विशाखापट्टणम येथे झाली. तिसऱ्या जागतिक परिषदेत ५६ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे काम जागतिक स्तरावर

"आपत्ती निवारणामध्ये गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र शासनाने अतिशय चांगले काम केले आहे. हे काम जागतिक पातळीवर पोहोचण्यासाठी या परिषदेची मदत होणार आहे. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवरचे विविध देशांच्या प्रतिनिधींकडून इतरत्र होत असलेल्या या विषयीच्या कामाचे आदानप्रदान होणार आहे. आपत्तीचे धोके कमी होण्यासाठी काय प्रयत्न करावेत, याचे विचारमंथन या परिषदेत व्हावे. परिषदेसाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी मदत करेल.

चंद्रकांतदादा पाटील, मदत व पुनर्वसनमंत्री

दिंडोशीतील प्रकल्पग्रस्तांसाठीचा भूखंड विकासकाच्या घशात

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी): जोगेश्वरीतील भूखंडानंतर आता दिंडोशी येथील प्रकल्पग्रस्तांसाठी असलेला क लाख ३८ हजार मीटरचा भूखंड पालिकेच्या हातातून निसटला.या भूखंडप्रकरणी बुधवारी स्थायी समितीत सर्वपक्षीय नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. सपाचे नगरसेवक रईस शेख यांनी हरकतीचा मुद्दा मांडून हे प्रकरण उघड केले. याप्रकरणी येत्या स्थायी समितीत प्रशासनाने संपूर्ण माहिती देण्याचे आदेश अध्यक्ष यशवंत जाधव यांनी प्रशासनाला दिले.

या भूखंडावर चार हजार १३१ झोपड्या होत्या. पुनर्विकासानंतर येथे उभ्या राहणाऱ्या इमारतींत नियमानुसार पालिकेला पीएपीची घरे उपलब्ध होणार होती. असुविधा असलेल्या माहुल येथील पीएपीत जाण्यास प्रकल्पग्रस्तांणी नकार दिल्याने प्रशासनाने दिंडोशीत पीएपी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, पालिकेच्या या योजने विरोधात संबंधित विकासक मुंबई उच्च न्यायालयात गेला. मात्र, पालिकेच्या विधी खात्याने न्यायालयांत योग्यरित्या बाजू मांडली नसल्यामुळे हा भूखंड विकासकाला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

अमेरिकेतील उद्योजकांनी भारतासोबत काम केल्यास जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र बदलेल

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी): देशात आरोग्य, शिक्षण, उद्योग व आर्थिक क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत. भारतातील उद्योजक आणि अमेरिकेतील उद्योजकांनी एकत्रित काम केल्यास केवळ दोन्ही देशातीलच नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र बदलू शकेल असा, विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हॉटेल ताज पॅलेस येथे आयोजित 'युएस बिझनेस कौन्सिल'च्या ४३व्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या 'इंडिया आयडियाज समिट' या दोन दिवसीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ''महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजीन आहे. देशाच्या विकासात राज्याचे मोठे योगदान आहे. सन २०२५पर्यंत ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्था होण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. देशातील मोठ्या प्रकल्पांपैकी सर्वाधिक प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. मुंबईत ३०० किलोमीटर लांबीचा मेट्रो प्रकल्प आकारास येत आहे. उद्योगांसाठी आवश्यक असणारे लॉजिस्टिक सपोर्ट उभे राहण्यासाठी लॉजिस्टिक पार्क उभारण्यात येत आहेत. सुमारे १०० भारतीय कंपन्यांनी अमेरिकेत ५०० बिलीयन डॉलर गुंतवणूक केली असून ९१ हजार रोजगार तिथे तयार केले आहेत. या कंपन्यांपैकी बहुतांश कंपन्या या महाराष्ट्रातील आहेत. याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. अमेरिकेतील उद्योजकांचे राज्यात स्वागत करताना इतर क्षेत्रांतही उभय देशांनी एकत्रित काम करावे, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान आरोग्य, शिक्षण, उद्योग, आर्थिक या क्षेत्रांसह पायाभूत सुविधांच्या विकासात महाराष्ट्रात अमर्याद संधी उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज 'इंडिया आयडीयाज' या ४३व्या वार्षिक परिषदेतील उद्योजक शिष्टमंडळांच्या चर्चेत सांगितले.

दि फ्रेण्डस को-ऑप बँक लि.(अवसायनात)
मोहम्मद मंजील, १ला मजला, नवरोजी हिल रोड नं.१, डोंगरी, मुंबई - १

दिनांक : ०१.०९.२०१८

अंतिम सर्व साधारण सभेची नोटीस

दि फ्रेण्डस को-ऑप बँक लि.(अवसायनात)मुंबई ही बँक दिनांक०६/०८/२००१ पासून अवसायनात गेलेली आहे. या बँकेच्या सर्व सभासदांची अंतिम सर्व साधारणसभा (अवसायक) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०९/२०१८रोजी दुपारी १.०० वाजताा दि फ्रेण्डस को-ऑप. बँक लि.(अवसायनात), मोहम्मद मंजील, १ला मजला, नवरोजी हिलरोड नं.१, डोंगरी, मुंबई -९ येथे ठेवण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहून सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा,ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि फ्रेण्डस को-ऑप बँक लि.(अवसायनात)मुंबई ही बँक दिनांक०६/०८/२००१ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०२अन्वये अवसायनात काढलेली असून कलम १०३अन्वये अवसायक या नात्याने आजपर्यंत अवसायकानी केलेल्या कामकाजाचा अहवाल.
२) अंतिमलेखापरीक्षण अहवाल दिनांक३१/०८/२०१८अखेरची नोंद घेण्याबाबत.
३) बँकेचे अवसायनाचे कामकाज पूर्ण करून नोंदणी रद्द केल्यानंतर राहिलेल्या रकमेचा विनियोग संबंधी विचार करणे.
४) अवसायक यांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

(एल.एस.लष्कर)
(अवसायक)
ठिकाण :मुंबई
दिनांक :०१/०९/२०१८ दि फ्रेण्डस को-ऑप. बँक लि.(अवसायनात)

टिप:कोरम् अभावी तहकूब झालेली सभा ठरलेल्या वेळी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेतली जाईल व त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.

अधिकाऱ्यांच्या संगनमताने एका रात्रीत बांधले बेकायदा स्टॉल

कठोर कारवाई करण्याची नगरसेवकांची मागणी

मुंबई, दि.५ (प्रतिनिधी): दादरच्या मार्केटमध्ये एका रात्रीत बेकायदेशीरपणे पाच स्टॉल उभारण्यात आल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. विकास नियोजन आणि इमारत विभागाच्या संगनमताने बांधकाम झाले आहे. याप्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली. याप्रकरणी स्थायी समिती अध्यक्षांनी चौकशीचे आदेश दिले.

दादर येथील हॉकर्स प्लाझामध्ये फूटपाथवरील दुकानांसाठी १५० गाळे बांधण्यात आले. परंतु येथील दुकानदार आजही दुकानांच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, मार्केट विभागाच्या अधिकाऱ्यांनी पालिका अधिनियामांची पायमल्ली करून हॉकर्स प्लाझामध्ये गाळे रिक्त असताना एका रात्रीत पाच गाळे बांधले आहेत. मोकळ्या जागेत हे बांधकाम झाले असून कोणाच्या सांगण्यावरून बांधकाम झाले, याचा प्रशासनाने खुलासा करावा, आरोप समिती सदस्य प्रभाकर शिंदे यांनी हरकतीच्या मुद्याद्वारा केला. तसेच स्थायी समितीने मार्केटची पाहणी करावी, अशी मागणी केली. या मुद्याचे सर्वपक्षीय नगरसेवकांनी समर्थन करून पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली. विकास नियोजन व इमारत विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने पालिकेला हक्काच्या जागांवर पाणी सोडावे लागत असल्याचा आरोप यावेळी नगरसेवकांनी केला. तसेच या मागे मार्केट विभागातील बड्या अधिकाऱ्यांचा हात असल्याचा संशय व्यक्त केला. अभिजीत सावंत, सदा परब यांनी केला.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
CIN: U40109MH2005SGC153645

ई-निविदा सूचना

ई-नोंदणीकृत, शासकीय, निमशासकीय नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदारांकडून, खालील कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत असून त्याबद्दलचा इतर सर्व सविस्तर तपशील कंपनीच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध असून, विक्री तारीख दि. ०६/०९/२०१८ पासून १४/०९/२०१८ पर्यत आहे. ई-निविदा सादर करण्याची वेळ दिनांक १५/०९/२०१८ रोजी दुपारी १३.०० पर्यत आहे आणि शक्य असल्यास त्याच दिवशी निविदा उघडण्यात येईल.
संपर्क अधिकारी : अति. कार्यकारी अभियंता (स्थापत्य), कल्याण, **दूरध्वनी क्र.** २३२७८५६,२३२८२८३
विस्तारित क्र. ३०९.

ई-निविदा क्र.	कामाचा तपशील	अंदाजीत रक्कम (रु. लक्ष)	इसारा रक्कम	काल मर्यादा	निविदा मूल्य
ईईसी/कल्याण /टि-०२३/ २०१८-१९	म.रा.वि.वि.कं.मर्यादित कल्याण (प) येथील तेजश्री इमारत परिसरात अतिथिगृह चालविणेबाबत.	५.४०/-	रू. ५,४००/-	१२ महिने	रू. १००० + १८% जीएसटी (रु. ११८०)

सही/-
कार्यकारी अभियंता (स्थापत्य), स्थापत्य विभाग, कल्याण

राम कदमांवर कारवाई करा : उद्धव ठाकरे

मुंबई : भाजपने आ. राम कदम यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान राम कदम यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्याचा सध्या सर्वच स्तरातून निषेध करण्यात येत आहे.

याबाबत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ''मुख्यमंत्र्यांनी आणि भाजपने राम कदमांवर लवकरात लवकर कारवाई करावी. एकीकडे 'बेटी पढाओ बेटी बचाव' असा नारा देत असताना राम कदम यांच्यासारखे आमदार मात्र असे काहीही वक्तव्य करतात, ज्यामुळे त्यांना आता 'बेटी बचाओ'चा नारा द्यावा लागणार असल्याचे सांगत त्यांनी टोला लगावला. तसेच श्रीपाद छिंदम, प्रशांत परिचारक यांच्यावर ज्याप्रकारे कारवाई करण्यात आली तशीच कारवाई कदम यांच्यावर करावी आणि त्यांना कोणत्याही पक्षाने उमेदवारी देऊ नये,''

दरम्यान, या सर्व गदारोळानंतर महिलांबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याबद्दल राम कदम यांनी दिलगिरी व्यक्त केली. मात्र माफी मागितलेली नाही.

आरती बनसोडे यांना गुरू द्रोणाचार्य पुरस्कार

मुंबई : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या भांडुपमधील आरती बनसोडे यांना यंदाचा गुरू द्रोणाचार्य पुरस्कार खा. किरीट सौमय्या यांच्या हस्ते देण्यात आला. भावी पिढी घडवून देशाचा पाया भक्कम करणाऱ्या शिक्षण विभागातील शिक्षक, मुख्याध्यापक यांना दरवर्षी गुरू द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. आरती बनसोडे या गणिताच्या शिक्षिका आहेत. याशिवाय त्या विद्यार्थी आणि पालक यांचे प्रबोधनदेखील करतात. या वेळी नगरसेविका साक्षी दळवी, चारूशिला समजिसकर, दीपक दळवी, माजी नगरसेवक हरिश्चंद्र त्रिपाठी, गणेश कुंदर, राजपाल बगाडी, सुरज त्रिपाठी उपस्थित होते.

रघुवंशी को.ऑप.बँक लि. (अवसायानात)
अंजेलिया को-ऑप.हौ.सो.लि. सी विंग, ४था माळा,रूम नं.४०१, सरोजनी रोड, जुना पोलीस कोर्ट लेन, विलेपार्ले (प), मुंबई - ४०० ०५७

दिनांक : ०१/०९/२०१८

अंतिम सर्व साधारण सभेची नोटीस

रघुवंशी को-ऑप. बँक लि.(अवसायनात) मुंबई ही बँक १८/०३/२००५ पासून अवसायनात गेलेली आहे. या बँकेच्या सर्व सभासदांची अंतिम सर्व साधारण सभा अवसायक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०९/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता रघुवंशी को-ऑप. बँक लि.(अवसायनात) , अंजेलिया को-ऑप. हौ.सो.लि. सी विंग, ४था माळा, रूम नं.४०१, सरोजनी रोड, जुना पोलीस कोर्ट लेन, विलेपार्ले (प), मुंबई - ४०० ०५७ येथे ठेवण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहून सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा, ही विनंती.

सभेपुढील विषय

१) रघुवंशी को-ऑप बँक लि. (अवसायनात) मुंबई ही बँक दिनांक १८/०३/२००५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायनात काढलेली असून कलम १०३ अन्वये अवसायक या नात्याने आजपर्यंत अवसायकांनी केलेल्या कामकाजाचा अहवाल.
२) अंतिम लेखापरीक्षण अहवाल दिनांक ३१/०८/२०१८ अखेरची नोंद घेण्याबाबत.
३) बँकेचे अवसायनाचे कामकाज पूर्ण करून नोंदणी रद्द केल्यानंतर राहिलेल्या रकमेचा विनियोग संबंधी विचार करणे.
४) अवसायक यांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

(एल.एस.लष्कर)
ठिकाण : मुंबई (अवसायक)
दिनांक : ०१/०९/२०१८ रघुवंशी को-ऑप. बँक लि. (अवसायनात)

टिप :कोरम अभावी तहकूब झालेली सभा ठरलेल्या वेळी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेतली जाईल व त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही.

इनोव्हासीन्थ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : फ्लॅट क्र. सी- २/३, केएमसी नं. ९१, इनोव्हेसीन्थ कॉलनी, खोपोली - ४१० २०३, महाराष्ट्र, भारत
सीआयएन : L67120MH2008PLC178923
दूर. : + ९१-२१९२-२६०१००, २६२२२४ फॅक्स : + ९१-२१९२-२६३६२८
वेबसाइट : www.innovassynthinvestments.in
ई-मेल : secretarial@innovassynthinvestments.in

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या सभासदांची अकरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ३०.०९.२०१८ रोजी स. ११.०० वाजता क्र. सी- २/३, केएमसी नं. ९१, इनोव्हेसीन्थ कॉलनी, खोपोली - ४१० २०३ येथे आयोजित करण्यात येत आहे. सभा आयोजित करणाऱ्या सूचनेसमवेत वित्तीय वर्ष २०१७-१८ करिताचा वार्षिक अहवाल सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर टपाल/कुरीयरद्वारे पाठवण्यात आला असून ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरीज्/कंपनीकडे नोंदवलेले असतील त्यांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात आला आहे. सदर वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाइट www.innovassynthinvestments.in वर उपलब्ध आहे तसेच परीक्षणार्थ तो कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सभेच्या तारखेपर्यंत सर्व कार्यदिवशी कामकाजाच्या वेळेत उपलब्ध असेल.

कंपनी आपल्या सभासदांना सभेमध्ये मंजूर करावयाच्या प्रस्तावित ठरावांवर इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मत देण्याची सुविधा (ई-मतदान) उपलब्ध करून देत आहे. सभासद त्यांची मते सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक प्रणालीचा वापर करून (परोक्ष ई-मतदान) करू शकतील. कंपनीने ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी एजन्सी म्हणून नॅशनल सीक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल)ची सेवा नेमली आहे.

सभा आयोजित करणाऱ्या सूचनेसमवेत युजर आयडी व पासवर्ड असलेला ई-मतदानासंदर्भातील पत्रव्यवहार सभासदांना पाठवण्यात आला आहे. सभेची सूचना व ई-मतदानाच्या पत्रव्यवहाराचे प्रारूप कंपनीची वेबसाइट www.innovassynthinvestments.in वर व एनएसडीएलची वेबसाइट https://www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

परोक्ष ई-मतदान गुरुवार, दि. २७.०९.२०१८ रोजी स. ११.०० वाजता सुरू होईल व शनिवार, दि. २९.०९.२०१८ रोजी सायं. ५.०० वाजता संपेल. वरील तारीख व वेळेपश्चात परोक्ष ई-मतदानास परवानगी नसेल. निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २०.०९.२०१८ रोजीनुसार सभासदांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नाव नोंद असलेली व्यक्ती केवळ परोक्ष ई-मतदान/सभेमध्ये मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र असेल.

नोंद दिनांक

एखादी व्यक्ती सभेच्या सूचनेच्या पाठवणीपश्चात सभासद बनत असल्यास व निर्धारित अंतिम तारखेनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्ती evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्याची विस्तृत प्रक्रिया सभेच्या सूचनेतही उपलब्ध आहे जी कंपनीची वेबसाइट तसेच एनएसडीएलच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल. सभासद ई-मतदानाकरिता एनएसडीएलकडे आधीच नोंदणीकृत असल्यास तो परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत देण्यासाठी त्याचा विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरू शकतो. परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सभासदही सभेस उपस्थित राहू शकतील परंतु त्यांना सभेमध्ये पुन्हा मत देता येणार नाही. ज्या सभासदांनी मत दिलेले नसेल त्यांना मतपत्रिकेद्वारे मत देण्याची सुविधा असेल. कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद ९१ व त्याअंतर्गत लागू नियमांतर्गत गुरुवार, दि. २०.०९.२०१८ ही तारीख वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सभासदांच्या नोंदीकरिताची नोंद दिनांक म्हणून निश्चित करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारची चौकशी वा माहितीसाठी तुम्ही एनएसडीएलकडे evoting@nsdl.co.in वर किंवा श्री. अमित विशाल ०२२-२४९९४३६०, पल्लवी दाबके ०२२-२४९९४५४५ येथे संपर्क साधू शकता.

इनोव्हासीन्थ इन्व्हास्टमेंट्स लिमिटेडकरिता
अभिषेक देशपांडे
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

नमुना ९
नियम १४ व २४ पहा
महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० (२) अन्वये सूचना

ज्या अर्थी तालुका : कल्याण गाव : सोनारपाडा
गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

फेरफाराच्या नोंदवहीत नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख	संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप	ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभाग क्रमांक २/१०/इ.२/१०/क
६०५	नोंदीचा प्रकार : खरेदी फेरफाराचा दिनांक : १२/०१/२०१७ माहिती मिळालेला दिनांक : १२/०१/२०१७ लिहून देणार वसंत श्रीधर आगटे, (खाता क्र. १९६) सर्व्हे क्र. २/१०/क, क्षेत्र ६८३.११०० हे.आर.चौमी पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ६८३.११०० हे.आर.चौमी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौमी. शकुंतला सदाशिव निंबाळकर, (खाता क्र. २१५) सर्व्हे क्र. २/१०/ई, क्षेत्र ५०१.६७०० हे.आर.चौमी पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ५०१.६७०० हे.आर.चौमी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौमी. लिहून घेणार : अष्टविनायक को.ऑ.हौ.सोसायटी लि., (खात क्र. ३७५) सर्व्हे क्र. २/१०/क लागवडीयोग्य क्षेत्र २५०.०००० हे.आर.चौमी. पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौमी. अष्टविनायक को.ऑ.हौ.सोसायटी लि., (खात क्र. ३७५) सर्व्हे क्र. २/१०/क लागवडीयोग्य क्षेत्र ५०१.६७०० हे.आर.चौमी. पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौमी. यांना दुय्यम निबंधक सह.दु.नि.कल्याण ४ यांचेकडील दस्त क्रमांक ६३४७/२००७ दिनांक २९/११/२००७ प्रमाणे रक्कम रुपये ६००००० घेऊन खरेदी दिलेने अपत्रक करुन खरेदी घेणार यांचे नावे दाखल केले. लिहुन देणार मे. शेवंता एंन्टप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.श्री.उत्तम सखाराम पाटील. लिहून घेणार : १) श्री. अष्टविनायक को.ऑ.हौ.सोसायटी लि. (नियोजित) त